NMC/AUDIT/OWL/2019/660
नाशिक महानगरपालिका,नाशिक
मुख्यलेखापरिक्षक यांचे कार्यालय,
जा.क्र/मुलेप/कार्यासन क्र.4/1261/19
दिनांक- 20/7/2019.

प्रति,
मा. सभापती,
स्थायी समिती,
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

विषय :- मुख्य वित्त व लेखाअधिकारी यांचे सन २०१८-१९ या वार्षिक लेख्यांचे लेखापरिक्षण अहवाल.

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन नगरविकास परिपत्रक क्र.लोलेस २०१६/प्र.क्र.०३/नवि-३१ दि. २२/०१/२०१६.
२) लेखा शाखेचे पत्र जा.क्र./मनपा/लेखा/वशि/४१९ दि. २/५/२०१९
३) जा.क्र./मनपा/लेखा/वशि/५८८ दि. ११/०६/२०१९

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये निर्देशिल्या प्रमाणे लेखा विभागाकडील संदर्भ क्र. 2 , व 3 अन्वये सादर केलेल्या वार्षिक लेख्यांची तपासणी करणेकामी व दस्तऐवज मिळणेकामी पुढील तपशिलाप्रमाणे पत्र जा.क्र./मुलेप/डेस्क-६/१२९/१९ दि.१८/०४/२०१९, जा.क्र./ मुलेप/डेस्क-६/४४०/१९दि.३/०५/२०१९, जा.क्र./मुलेप/डेस्क-६/४४१/१९दि.३/०५/२०१९, जा.क्र./ मुलेप/डेस्क-६/४४६/१९ दि.४/०५/२०१९, जा.क्र./ मुलेप/ डेस्क-६/४४७/१९ दि.४/०५/२०१९, जा.क्र./मुलेप/डेस्क-६/६४८/१९दि.२१/०५/२०१९,जा.क्र./मुलेप/डेस्क-६/६४९/१९दि. २१/०५/२०१९ जा.क्र/मुलेप/डेस्क१३/६८०/१९दि.२८/०५/२०१९,जा.क्र./मुलेप/डेस्क१३/६९१/१९दि.२९/०५/२०१९ जा.क्र./मुलेप/डेस्क-१३/९८९/१९दि.१४/०६/२०१९,जा.क्र/मुलेप/डेस्क-६/९९९/१९दि.१७/०६/२०१९ जा.क्र/मुलेप/डेस्क-६/१०००/१९दि.१८/०६/२०१९,जा.क्र/मुलेप/डेस्क५/१०१०/१९ दि.१९/०६/२०१९ जा.क्र./मुलेप/डेस्क-५/१०५३/१९दि.२७/०६/२०१९, जा.क्र./ मुलेप/ डेस्क- ११/१०७०/१९ दि.२/०७/२०१९, जा.क्र./ मुलेप/ डेस्क-४/१२०२/१९ दि.११/७/२०१९, जा.क्र./ मुलेप/ डेस्क-३/१२०५/१९ दि.१२/०७/२०१९ लेखा विभागास देण्यात आलीत. त्याअन्वये लेखा विभागाकडील पत्र क्र. ५८७ दि. ११/६/२०१९ , पत्र क्र. ८ दि. १८/६/२०१९, पत्र क्र. ६७१ दि. २८/०६/२०१९, पत्र क्र. ६७२ दि. २८/६/२०१९, पत्र क्र. १० दि. २९/६/२०१९, पत्र क्र. ६८५दि. १/०७/२०१९, पत्र क्र. ६८२ दि. १/०७/२०१९, पत्र क्र. ६८४ दि. १/०७/२०१९, पत्र क्र. ७०४ दि. १०/०७/२०१९, पत्र क्र. ७१० दि. १२/०७/२०१९, पत्र क्र. ७१३ दि. १५/०७/२०१९ अन्वये लेखा विभागाने अनुपालन सादर केले आहे.

वित्त व लेखा विभागाने अंदाजपत्रक सन २०१८-१९ मध्ये केलेल्या तरतुदी व पत्र क्रमांक ५८८ दि. ११/६/२०१९ अन्वये मा.स्थायी समितीवर सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील तपशिलात भाष्य केले आहे. मुळ अंदाजपत्रकात दर्शविलेली आकडेवारी व सुधारीत अंदाजपत्राकात मोठ्या प्रमाणावर बदल झालेले आहेत. त्याअनुषंगाने वास्तववादी अर्थसंकल्प होण्याच्या दृष्टीने भाष्य केलेले आहे. जमा रकमांबाबत सुधारीत अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने उद्दीष्टपुर्ती ही समाधान कारक दिसत असली तरी मुळ अर्थसंकल्पात दर्शविलेल्या अंदाजाच्या बरोबर तुलना करता समाधानकारक दिसत नाही. यामुळे अर्थसंकल्पातच वास्तवादी आकडेवारी येण्याच्या दृष्टीने विभागाने प्रयत्नशिल राहणे आवश्यक आहे. याकडे वित्त व लेखा विभागाने सर्वसंबंधीतांचे लक्ष वेधणे गरजेचे आहे.

सन २०१८-१९ चे वार्षिक लेख्यांचे (जमा खर्च) लेखापरिक्षण केले असता खालील प्रकारच्या आक्षेपार्ह बाबी आढळुन आल्या.

परिच्छेद क्र.१ वर्षनिहाय जमा व खर्चाची संक्षिप्त आकडेवारी :-

१-अ) :- सन २०१८-१९ जमा खर्चाची संक्षीप्त आकडेवारी तपशिल पुढील प्रमाणे आहे :-

(रू. लाखात)

अंदाजपत्रक	मा.आयुत्तांनी शिफारस केलेले अंदाज	मा.स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाज	मा.महासभेचे मुळ अंदाजपत्रक	सुधारीत अंदाजपत्रक	प्रत्यक्ष जमा व खर्च
अ) जमा					
प्रारंभिची शिल्लक	४८९८.५७	४८९८.५७	४८९८.५७	२९८१२.०८	२९८११.९४
अंदाजपत्रक अ	१५००३८.४४	१६१५३८.४४	१७४८६६.४४	१२०५३४.१३	१२०७१६.८३
अंदाजपत्रक क	९४०१.७०	९४०१.७०	९४०१.७०	८७५८.४९	९६०९.४५
अंदाजपत्रक प	२०५.५०	२०५.५०	२०५.५०	१५१.४९	१६६.९७
एकूण	१५९६४५.६४	१७११४५.६४	१८४४७३.६४	१२९४४४.११	१३०४९३.३०
इतर उचल परत जमा	१३९७०.५०	१३९७०.५०	१३९७०.५०	६६६१.०२	४२८९.३९
एकूण एकंदर जमा	१७३६१६.१०	१८५११६.१०	१९८४४४.१०	१३६१०५.१०	१३५२१४.४०
प्रारंभिक शिल्लकेसह एकूण जमा	१७८५१४.७१	१९००१४.७१	२०३३४२.७१	१६५९१७.२१	१६४५९४.६३
ब)खर्च(महसुली) अ,क,प	८९८२०.९५	८९९२७.९५	९००५२.९५	९२७०६.२९	७९९३६.५९
भांडवली खर्च अकप	६५०१६.००	७४३९४.५०	८७५५४.५०	४५४७३.४९	२९२५५.३६
इतर उचल जमा	११३६९.९०	११३६९.९०	११३६९.९०	४९४५.००	४१६२.६६
19% खर्च बाबी	१२११७.१९	१४२८१.८५	१४२८१.८५	००.००	२७१९.४८
एकूण एकंदरखर्च	१७८३२४.०४	१८९९७४.२०	२०३२५९.२०	१४३१२४.७८	११६०७४.०९
अखेर शिल्लक	१९०.६७	४०.५१	८३.५१	२२७९२.४३	४८५२०.४७
एकूण एकंदर	१७८५१४.७१	१९००१४.७१	२०३३४२.७१	१६५९१७.२१	१६४५९४.५६

मागील वर्ष सन 2017-18 अखेरची जमा-खर्च व डेबुक नुसार शिल्लक रक्कम रुपये 29812.08 लक्ष असुन सन 2018-19 च्या मुळ अंदाजपत्रकात मागील वर्षाअखेरची शिल्लक हीच पुढील वर्षाची प्रारंभिची शिल्लक रक्कम रुपये 29812.08 लक्ष असणे आवश्यक होते. मात्र सन 2018-19 चे मुळ अंदाजपत्रकात प्रारंभिची शिल्लक रक्कम रुपये 4898.57 लक्ष इतकीच दर्शविणेत आली. म्हणजेच रक्कम रुपये 24913.51 लक्ष इतकी कमी दर्शविणेत आलेली आहे. विभागाने सांखिकी तपशिलाची अचुकतेची खात्री करणे आवश्यक आहे. ज्या अन्वये जमा उत्पन्न वास्तववादी दिसेल.

सन २०१८-१९ या वर्षीच्या अंदाजपत्रकात जमा रक्कमेचे अंदाज प्रारंभिक शिल्लक र. रू. 48.98 कोटी धरून एकूण अंदाज र. रू. २०३३.४३ कोटी धरले परंतु प्रत्यक्षात जमा मात्र र. रू. १३५२.१४ कोटी जमा झालेत म्हणजेच जमा मुळ अंदाजापेक्षा (प्रारंभिक शिल्लक वगळुन) र.रु. ६३२.३१ कोटी इतकी कमी रक्कम जमा झालेली आहे. वित्तिय वर्षे सन २०१७-१८ मध्येही प्रत्यक्ष जमा जमा र. रू. १२९७.३८ कोटी होती. त्याअनुषंगाने अर्थसंकल्पात वाढ दर्शविणे आवश्यक असतांना अवास्तव अंदाज दर्शविण्यात आलेत. त्यामुळे मनपाचे खर्चाचे वास्तववादी नियोजन करण्यास अडचणी येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तरी याबाबत भविष्यात दक्षता घ्यावी.

१-ब) मागील तीन वर्षाची अर्थसंकल्पीय तरतुदीची संक्षीप्त आकडेवारी :-

मागील तीन वर्षातील मा. आयुक्त, मा. स्थायी समिती, मा. महासभा यांचे अंदाज तसेच प्रत्यक्ष जमा व खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रू. कोटीमध्ये)

वर्ष	मा.आयुक्त	मा.स्थायी समिती	मा.महासभा	प्रत्यक्ष जमा	प्रत्यक्ष खर्च
२०१५-१६	१४३७.६७	१७६९.९७	२१७९.९७	११३२.८४	९८७.६८
२०१६-१७	१३५७.९६	१७३७.९६	१७६१.५२	१२२५.५३	१०८०.८६

२०१७-१८	१४१०.०८	१७९९.३०	२१७६.४१	१४४२.०५	११४३.९३
एकूण	४२०५.७१	५३०७.२३	६११७.९	३८००.४२	३२१२.४७
सरासरी	१४०१.९०	१७६९.०८	२०३९.३०	१२६६.८१	१०७०.८२

उपरोक्त विवरण पत्रावरून व अर्थकंल्पीय विवरणावरून खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

मनपाचे अर्थसंकल्पीय अंदाज हे पारंपारीक पध्दतीने घेतलेले आहेत. अर्थसंकल्प वास्तववादी होण्यासाठी मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रकमा, थकबाकी रक्कम या गृहीत धरणे आवश्यक आहे व त्यावर आधारीत चालु अर्थसंकल्पात जमा गृहीत धरली पाहिजे. परंतु उपरोक्त तक्त्यावरून असे दिसुन येते की, मागील 3 वर्षातील प्रत्यक्ष जमा रकमा खुप कमी आहेत. त्या तुलनेत मागील तीन वर्षाची जमेची सरासरी १२६६.८१ कोटी असतांना सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात मुळ अंदाजपत्रकानुसार र. रू. २०३३.४३ कोटी एवढी जमा रक्कम अंदाजीत केलेली होती. तथापि, प्रत्यक्ष र. रू.१६४५.९४ कोटी जमा झाली आहे. तसेच मागील तीन वर्षाची खर्चाची सरासरी १०७०.८२ असतांना मुळ अंदाजपत्रकानुसार खर्च रूपये २०३२.५९ कोटी अंदाजीत केलेला होता. प्रत्यक्षात रूपये 1160.74 कोटी प्रत्यक्ष खर्च केला आहे. यामुळे अंदाजपत्रकातील रकमा या वास्तववादी असण्याकडे यापुढे प्रयत्न व्हावेत. यापुढे विभागांकडून अचुक आकडेवारी प्राप्त होईल या अनुषंगाने मुख्य वित्त व लेखाधिकारी यांनी यापुढे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्र. 26 (3) प्रमाणे कार्यवाही करणेबाबत दक्षता घ्यावी.

१-क) महत्वाच्या जमा रक्कमांबाबतचा उदिष्ट पुर्ततेबाबत :-

सन 2018-19 मध्ये मालमत्ता कराची अंदाजीत जमा रूपये महासभा अंदाजपत्रकात 128.28 कोटी इतकी मुळ अर्थसंकल्पात व सुधारित अर्थसंकल्पात 54.42 कोटी रूपये दर्शविण्यात आली आहे. प्रत्यक्षात जमा मात्र 47.10 कोटी रूपये एवढीच म्हणजेच मुळ अंदाजपत्रकाच्या 63.28% इतकी कमी जमा झालेली आहे. सन 2015-16 ते 2017-18 ची सरासरी जमा (38.30+37.74+40.34) = 38.79 कोटी एवढी आहे. तसेच विकास शुल्काची अंदाजित रकम रू. 160 कोटी असतांना प्रत्यक्ष जमा 20.49 कोटी रूपये एवढीच म्हणजेच मुळ अंदाजपत्रकाच्या 87.20% इतकी कमी जमा झालेली आहे. याप्रमाणेच इतर जमा रकमांचे अंदाजात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आल्याचे दिसुन येते. यामुळे अर्थसंकल्पीय तरतुद वास्तववादी असण्याच्या दृष्टीने दक्षता घेणे आवश्यक आहे.

याचप्रमाणे इतरही बाबतीत जमा होणाऱ्या रकमांच्या अनुषंगाने वार्षिक लेख्यांची तपासणी केली असता अंदाजपत्रकातील लेखाशिर्षानुसार मुळ अंदाज व प्रत्यक्ष जमा यामध्ये मोठी तफावत दिसणे अपेक्षीत नाही. तफावत मोठी असल्यास खर्चाचे व त्या अनुषंगाने अर्थ संकल्पाच्या अंमल बजावणीचे नियोजन चुकू शकते वानगीदाखल काही लेखाशिर्षाचा गोषवारा पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

सन २०१८-१९ लेखाशिर्षानिहाय काही जमा रक्कमांचा गोषवारा

अ.क्र	जमा बाजु लेखा शिर्ष	कोड नं.	मा.आयुक्त यांची मुळ अंदाजपत्रक (र.रू लाखात)	मा. महासभेने मंजुर कलेले अंदाजपत्रक (र.रू लाखात)	जमा रक्कम रूपये (र.रू लाखात)	तफावत र. रू. (५-६) (र.रू लाखात)	तरतुदीपेक्षा कमी उत्पनाची टक्केवारी(र.रू लाखात)
१	२	३	४	५	६	७	८
१	जमिन घरपट्टी यावरील कर	११०८	१२८२८.००	१२८२८.००	४७०९.९२	८११८.०८	६३.२८%
२	मधवर्ती सरकारच्या इमारतीवरील सेवा आकार	१११२	२४३.००	२४३.००	४.७३	२३८.२७	९८.०५%
३	इमारतगाळेखुल्या जागा प्रिमियम मोबदला हस्तांतरण फी	११२३	४८००.००	४८००.००	८४७.९४	३९५२.०६	८२.३३%
४	इमारत परवाना फी	११३४	५००.००	५००.००	६०.८२	४३९.१८	८७.८४%
५	विकास शुल्क	११३७	४५००.००	१६०००.००	२०४९.००	१३९५१.००	८७.१९%
६	जीना- पॅसेज प्रिमियम फी	१३४९	६७९.००	६७९.००	१०८.६६	५७०.३४	८४.००%
७	अल्टरनेट टेरेस फी	१३५०	६१.००	६१.००	१५.७३	४५.२७	७४.२१%

८	वॉरंट फी (मनपा) व्याज	११४०	३३८.५०	३३८.५०	७८.२७	२६०.२३	७८.८८%
९	करावरील व्याज फी	११४१	५००.००	५००.००	०.४५	४९९.५५	९९.९१%
१०	जमिन व इमारत यावरील कराचा भरणा विलंबाने केल्याने दंड आकारणी	१३००	५०२५.५०	५०२५.५०	१०६४.०९	३९६१.४१	७८.८३%
११	जैविक कचरा विल्हेवाट व त्यावरील रॉयल्टी	१३४१	४७.००	४७.००	०.००	४७.००	१००.००%
१२	कोंडवाडे	११२१	२.००	२.००	०.००	२.००	१००.००%
१३	मोजणी ना हरकत दाखला फी	१३४८	१.००	१.००	०.००	१.००	१००.००%
१४	ग्रंथ यात्रापासुन मिळणारे उत्पन्न	१३४४	१.००	१.००	०.००	१.००	१००.००%
१५	फेरीवाला दैनंदिन जागा लायसेन्स फी	१३१२	१.००	१.००	०.००	१.००	१००.००%
१६	परिवहन सेवा उत्पन्न	१३६२	१.००	१.००	०.००	१.००	१००.००%
१७	करमणुक कर अनुदान	११४७	७५.००	७५.००	०.००	७५.००	१००.००%
१८	माध्यमिक शिक्षण अनुदान	११४८	८२०.००	८२०.००	०.००	८२०.००	१००.००%
१९	पंतप्रधान आवास योजना अनुदान	१३४३	१०००.००	१०००.००	०.००	१०००.००	१००.००%
२०	शासकिय भूईभाडे अनुदान	१३५४	१९५.००	१९५.००	०.००	१९५.००	१००.००%
२१	शेतीसारा व बिनशेती सारा अनुदान	११५४	२५.००	२५.००	०.००	२५.००	१००.००%
२२	मलेरीया अनुदान	११५६	१७७७.५०	१७७७.५०	६७३.९४	११०३.५६	६२.०८%
२३	लोकल फंडसेस	११६६	१०.००	१०.००	०.००	१०.००	१००.००%
२४	इतर प्रयोजनासाठी अनुदाने	११७२	१००.००	१००.००	०.००	१००.००	१००%
२५	जात सर्वेक्षण अनुदान	१३१०	१.००	१.००	०.००	१.००	१००.००%
२६	जमगणना अनुदान	११०७	५.००	५.००	०.००	५.००	१००.००%
२७	सहावी आर्थिक गणना अनुदान	१३१६	१.००	१.००	०.००	१.००	१००.००%
२८	खत विक्री	११८०	५०.००	५०.००	०.००	५०.००	१००.००%
२९	फाळके स्मारक निधीतुन जमा	१२४१	५०.००	५०.००	०.००	५०.००	१००.००%
३०	मोबाईल टॉवर फी	१२९४	२०.००	२०.००	०.००	२०.००	१००.००%
३१	मक्तेदारास व अन्य सर्व अॅडव्हान्स जमा	११९७	५००.००	५००.००	३९.९१	४६०.०९	९२.०२%
३२	धनादेश वटवनावळ फी /दंड	१२९७	१.००	१.००	०.००	१.००	१००.००%
३३	रस्ते बांधणे व त्याचे परिरक्षण अनुदान	११५०	५००.००	२९०३.००	१२५.००	२७७८.००	९५.६९%
३४	विशेष अनुदान	१२८२	१०००.००	११८००.००	३०६.७६	११४९३.२४	९७.४०%
३५	ड्रेनेज जोडणी फी	१२१९	१००.००	१००.००	२७.९६	७२.०४	७२.०४%
३६	झोपडपट्टी सुधारणा अनुदान	११६३	१.००	१.००	०.००	१.००	१००.००%
३७	टी. सी. एस. जमा	१३१७	२.५०	२.५०	०.००	२.५०	१००.००%
३८	कर्मचारी वर्गास संगणक खरेदीसाठी दिलेला अग्रीम जमा	१२६१	५०.००	५०.००	९.३९	४०.६१	८१.२२%
३९	मनपा शिक्षण विभागास शासन हिश्याची 50 % रक्कम अग्रीम परतभरती	१३५६	३६००.००	३६००.००	०.००	३६००.००	१००.००%
४०	राखीवनिधीचे	१३०९	२०००.००	२०००.००	०.००	२०००.००	१००.००%

	रोखीकरण (वेतन घसारा राखीवनिधी)						
		एकुण	४१४१२	६६११५	१०१२२.५७	५५९९२.४३	८४.६९%

वरील उदाहरणादाखल लेखाशिर्षामध्ये मा. आयुक्त याचे मुळ अंदाज पत्रकात र. रू. ४१४.१२ कोटी जमा अपेक्षित धरली होती. मात्र मा. महासभेने तयार केलेल्या अंदाजपत्रकात सदर लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात वाढ करून र. रू. ६६१.१५ कोटी इतकी जमा दाखविणेत आली.

मात्र वर्षाअखेर ती प्रत्यक्षात र. रू. १०१.२३ कोटी इतकीच जमा झाली. म्हणजे र. रू. ५५९.९२ कोटी कमी जमा झाली असुन याप्रमाणे कमी रकमा मनपास प्रत्यक्षात जमा झालेल्या आहेत. मात्र उपरोक्त प्रमाणे महसुल गोळा होण्याच्या अपेक्षेने उत्पन्नापेक्षा जादा विविध विकास कामांची प्रकरणे सादर/मंजुर झालेली आहे. त्यामुळे म. न. पा. च्या दायित्वामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. सबब वार्षिक अंदाजपत्रक वास्तववादी असणे आवश्यक आहे.

वरील अनुक्रमांक उदा. ११,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२५,२९ व ३६ या लेखाशिर्षान्वये सन २०१५-१६ पासुन अद्याप पावेतो कोणत्याही रकमा जमा झाल्याचे दिसुन येत नाही. अथवा सदर अनुदान / उत्पन्न मिळविणेकामी प्रयत्न केला नसल्याचे दिसुन येते. तरीही सदर लेखाशिर्षातुन र.रु. २२१७.00 लक्ष इतकी मोठ्या प्रमाणात जमा तरतुद अपेक्षित धरली होती. यामुळे लेखाशिर्ष व अंतर्गत तपशिलावर बाबींचे स्पष्टीकरण सुस्पष्ट होणे आवश्यक आहे.

स्थानिक संस्था कर 1% सरचार्ज (मुद्रांक शुल्क) या लेखा शिर्षकात विभागाने मुळ अंदाजपत्रकात तरतुद र.रु. ०.० लक्ष धरणेत आली होती, परंतु सदर लेखाशिर्षात रकमा जमा झाल्यानंतर विभागाने सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद करणेत आली. याबाबत विभागाने सदर लेखाशिर्षात रकमा जमा होत असतांनाही मुळ अंदाजपत्रकात तरतुद करणेत आली नाही, तरी अशा बाबींबाबत विभागाने वेळीच दक्षत घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींवरून अर्थसंकल्प तयार करतांना मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रकमा, थकबाकी रक्कम व त्यावर आधारीत चालु अर्थसंकल्पात जमा गृहीत न धरता केले आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, १९७१ नियम क्र. २६ (३) नुसार उत्पन्नाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या जमेच्या तुलनेवर आधारलेले असले पाहिजे. करांपासुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठरावीक मागणी असते अशा मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाचे अंदाज मात्र मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरी पर्यंत मर्यादित असावेत. अथवा त्या वर्षाची मागणी, अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी यापैकी जी कमी असेल तेवढे असावे. या बाबत विभागांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. याबाबत सर्व संबंधित विभागांना सुचना द्याव्यात व यापुढे दक्षता घ्यावी.

परिच्छेद क्र २ :- अंदाजपत्रकीय तरतुद व खर्च आकडेवारी बाबत :-

वार्षिक लेख्यांची तपासणी केली असता मंजुर अंदाजपत्रकातील लेखाशिर्षानुसारच खर्च होणे आवश्यक होते. तथापि, अंदाजपत्रकातील काही लेखाशिर्षांची तरतुद व प्रत्यक्ष खर्च यामध्ये तफावत निदर्शनास आली आहे.

सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्च.

अ.क्र.	खर्च बाजु लेखा शिर्ष	कोड नं.	तरतुद र.रू (लाखात)	खर्च रक्कम रूपये	उणे खर्च रक्कम रूपये
१	जनगणना	६७३	१.३७	१३७४६७	-४६७
२	विज बिले	६८७	५.००	५१२३७०	-१२३७०
३	विजेचे दिवे केबल व सामुग्री खरेदी	३९७	२१२.००	२३२८६४५६	-२०८६४५६
४	विज खर्च	३९८	३०३८.००	३२०४६६३२२	-१६६६३२२
५	रस्त्यातील पोल हलविणे / कोटेन / मिटर	६२९	९८.००	१००३४६०३	-२३४६०३
६	नविन नाशिक स्थायी आस्थापना	४११	९३१.००	९३६३३२३३	-५३३२३३
७	इमा3रत दुरूस्ती	४७१	७४७.००	९०४६२४३५	-१५७६२४३५
८	पुल व सांडवे दुरूस्ती	४७३	३७.००	४१००६०६	-४००६०६
९	शेतसारा व बिनशेतसारा	४८९	४७.००	९०५६१४०	-४३५६१४०
१०	विज बिले	७००	७६.००	८५३९१८०	-९३९१८०
११	तरण तलाव देखभाल दुरूल्ती	७७७	१२६.००	१३११५२१०	-५१५२१०

१२	इतर उचल रकमा वस्तु व सेवा कर केंद्रशासन	२७	१००.००	११००७७६७	-१००७७६७
१३	इतर उचल रकमा वस्तु व सेवा कर राज्यशासन	२८	१००.००	११०४७७६५	-१०४७७६५
१४	मागासवर्ग 5% महसुली कामे	९६०	२.८८	२८८१७७	-१७७
१५	क्रिडा 5% महसुली कामे	९६४	२८.०२	२८०२०२५	-२५
१६	जे. एन. एन. यु. आर. एम. 30% मनपा हिस्सा वर्ग करणे	८१८	१६९७.००	२०९१०००००	-३९४०००००
१७	पंपिंग स्टेशन विद्युत बिले व मशिनसाठी ऑईल खरेदी	५६६	३३००.००	३४६५५८६४०	-१६५५८६४०
१८	शासकीय पाणी बिले	५६७	८५०.००	२००९८२३३३	-११५९८२३३३
१९	विज बिले	७०३	१२००.००	१२७६६७११०	-७६६७११०
		एकुण	**१२५९६.२७**	**१४८२७९७८३९**	**-२२३१७०८३९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ ते १०४ कडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्याअन्वये सदर खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

वरील लेखाशिर्षाचे खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. रक्कम रूपये २२,३१,७०,८३९/- इतका खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा झाल्याचे विवरणपत्रावरून दिसुन येते.

सुधारीत अर्थसंकल्पापेक्षा वेगवेगळया लेखाशिर्षकांतर्गत एकूण रक्कम रूपये २२,३१,७०,८३९/- एवढा जास्त खर्च झाल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८६ व महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम २८ नुसार अर्थसंकल्पीय शिर्षकाखाली तरतुद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च अनुज्ञेय नाही. सबब अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा रूपये २२,३१,७०,८३९/- हा जादा झालेला खर्च दिसतो. सदरच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ ते १०४ नुसार सदर कमी व जादा खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतली किंवा कसे याबाबत खात्री करण्यात यावी.

परिच्छेद क्र ३ :- शासन निर्देशाप्रमाणे १९% राखीव खर्च बाबींबाबत व वृक्ष प्राधिकरण निधी बाबत

३.१ विषयांकीत प्रकरणी खालील शासन आदेशान्वये अर्थसंकल्पीय तरतुदी विषद केल्या आहेत.

अ) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-१०९३/३२५/प्र.क्र. २४नवि-३२ दि. १७/४/९३ व नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन-१०९३/११९८/नवि-१४ दि. १४/७/९३ अन्वये महिला व बालविकास कल्याण यासाठी ५%

ब) शासन परीपत्रक, नगरविकास विभाग क्र. संकीर्ण २०१०/ प्र.क्र. १४६ दि ३०.१०.२०१० व नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/ प्र.क्र. ११८/ नवि-२० दि. २८/१०/२०१५ अन्वये अपंग कल्याणासाठी ३%

क) नगर विकास विभाग आरोग्य, मंत्रालय, मुंबई ३२ दि. ३ जुलै, १९८२ अन्वये मागासवर्गीय कल्याणकारी योजना- ५%

ड) नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. जीइएन १०९८/प्र.क्र. २१/९८/नवि- २४/ मंत्रालय, मुंबई ३२, दि. ९/३/१९९८ अन्वये क्रिडा क्षेत्रासाठी ५%

उपरोक्त निर्देशाप्रमाणे मनपाने अर्थसंकल्पीय तरतुदी करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेने निकषाप्रमाणे अर्थसंकल्पीय तरतुदी केलेल्या आहेत. सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात या बाबींवरील खर्च स्वतंत्र नमुद करण्यात आला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(र. रू. लाखात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	सन २०१८- १९ मा. महासभेची तरतुद	सन २०१८-१९ केलेला प्रत्यक्ष खर्च
१	महिला बाल व कल्याण कार्यक्रम ५ %	३७५८.३८	५२६.३०
२	अपंग पुनर्वसन ३ %	२२५५.०३	३४.७०
३	मागासवर्ग कल्याण ५%	३७५८.३८	९६७.१३
४	क्रीडा ५%	३७५८.३८	१०३०.०९
५	प्रशिक्षण १%	७५१.६८	१६१.२६
	एकुण	१४२८१.८५	२७१९.४८

अंदाजपत्रकीय तरतुद र.रु. १४२८१.८५ लक्ष इतकी असुन खर्च र.रु. २७१९.४८ लक्ष इतकाच म्हणजे तरतुदीच्या १९.८४% इतकाच खर्च करणेत आला.

खर्च आकडेवारी विचारात घेता निकषानुसार खर्च करण्याबाबत उपाय योजना करणे आवश्यक आहे.

३.२ शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्रमांक –बी.सी.सी १०९३/१६३०/प्र.क्र.१२२/९३/नवि-६/दिनांक २०/१२/९३ अन्वये समाजातील दुर्बल घटक अनुसुचीत जाती जमाती,विमुक्त जाती व भ्टक्या जमाती यांचे कल्याण्कारी योजने अंतर्गत ५% रककम राखुन ठवणे आवश्यक आहे व त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे आवश्यक आहे. तसेच योजना वित्तिय अनुशेषासह प्रत्येक वर्षात प्रभाविपणे राबविणे बाबत दक्षता कार्यकारी विभागांनी घ्यावयाची आहे. असे असतांना सन २०१८-१९ मध्ये भांडवली खर्च दलित वस्ती सुधार योजनेसह किंवा दलित उन्नती इतर योजना करीता केला गेला असल्यास तो शासन निधीतुन केला गेला आहे किंवा मनपा निधीतुन केला गेला आहे, याबाबतचे अभिलेखे लेखा विभागाने उपलब्ध न करून दिल्याने सदरची खात्री करता आली नाही. तथापि, विभागाच्या स्तरावर खात्री करावी व अनुपालन सादर करण्याची दक्षता घ्यावी, व योजना अंमलबजावणी बाबत संबंधीतांचे लक्ष वेधावे.

३.३ महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये झाडे तोडण्याचे नियमन करून राज्याच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यासाठी अधिक चांगली तरतुद करण्यासाठी आणि त्या क्षेत्रात समुचित प्रमाणात नविन झाडे लावण्याची तरतुद करणे अंतर्भूत करण्यात आलेले आहे. या अधिनियमातील कलम २ (क) मध्ये झाडांचे जतन करणे म्हणजे केवळ नविन झाडे जिवंत राहण्यासाठी आणि त्यांच्या संख्येत वाढ होणे करीता इतर कामे करणे असे स्पष्ट नमुद केलेले आहे. तसेच प्रकरण सहा कलम १५ अन्वये एकूण जमा रकमेच्या ½ % रकमेची वृक्ष प्राधिकरण खाती तरतुद करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. तथापि, वृक्ष निधी अंशदान खाती मुळ अंदाजपत्रकात व सुधारीत अंदाजत्रकात तरतुद केलेली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष रक्कम वर्ग करण्यात आलेली नसल्याचे अंदाजपत्रकीय विवरणावरून दिसुन येते, वित्त विभागाने वृक्ष प्राधिकराचे याबाबीकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.४ :- <u>संक्षिप्त जमा खर्च गोषवारा बाबत:-</u>

लेखापरिक्षण विभागाचे पत्र क्र. ९९९ दि. १७/६/२०१३ अन्वये वित्त विभागाकडून प्रत्यक्ष जमा व खर्चाची संक्षिप्त गोषवा-याची माहिती मागविण्यात आली होती. सदर माहिती वित्त विभागाचे पत्र क्र. ६८२ दि. १/७/२०१९ अन्वये प्राप्त झाली आहे.

त्यांनी सादर केलेल्या माहितीचा तपशिल सोबत जोडला आहे. त्याअन्वये सुधारीत अंदाज व अर्थसंकल्पीय तरतुद यामध्ये झालेला बदल रकाना क्र. ७ व ८ वरून निदर्शनास येत आहे. ही बाब पाहता अर्थसंकल्प तयार करतांना व सुधारीत अंदाज करतांना मोठी तफावत पडल्याचे दिसुन येत आहे. तरी विभागांनी यापुढे दक्षता घेणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.५:- <u>उपर्जित तत्वावर आधारित- दुहेरी नोंद पध्दतीच्या अंमलबजावणी बाबत:-</u>

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. MAR/१०२/००३/२२/प्र.क्र.२३/०३/नवि-८ दि. २५/७/२००३ आणि शासन निर्णय क्र.लेखासं-१०/२००४/७१ प्रक्र.५/०४ नवि-३१ दिनांक ६/७/२००५ अन्वये महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. अंतग्रत द्विनोंद लेखापध्दतीने लेखे ठेवणे आवश्यक आहे. सदर कामकाजासाठी मा. महासभा ठराव क्र. १२७० दि. ८/१२/२००४ व मा. स्थायी समिती ठराव दि. १३/२/२००७ अन्वये मंजुरी घेण्यात आलेली आहे. सदर कामकाज सद्यस्थितीत मे. एम.ए.पी.एस.व्ही. अँड असोसिएट यांना मा. स्थायी समिती ठराव क्र. २४८ दि. ११/७/२०१७ व मा. आयुक्त आदेश क्र. ८१ दि. २/८/२०१७ अन्वये देण्यात आलेले आहे. द्विनोंद लेखा पध्दतीचे कामकाज दि. १ एप्रिल २०१० ते ३१/३/२०१६ या कालावधीचे १५ महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि, आजमितीस कामकाज पुर्ण झाल्याचे दिसुन आलेले नाही, वा सदरच्या कामास सक्षम प्राधिकरण्याच्या मंजूरीने मुदतवाढ घेतल्याचे दिसुन आलेले नाही. तरी सदरचे कामकाज वेळीच पूर्ण होणे बाबत उचित कार्यवाही करावी.

संबंधीत लेखे पुर्ण होण्यासाठी खालील बाबी संबंधीत सनदी लेखापालास उपलब्ध करून देणे व इतर विभागाशी समन्वय ठेवणे बाबतची कार्यवाही वित्त विभागाने केल्यास सदरची कार्यवाही सत्वर होऊ शकेल. संबंधीत सनदी लेखापालास द्विनोंद लेखे तयार करण्यासाठी आऊटस्टँडींग अॅडव्हांसेस नोंदवही सन २०१० ते २०१६ (सण अग्रीम, संगणक अग्रीम, घरकर्ज अग्रीम, वाहनकर्ज अग्रीम नोंदवही) उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याशिवाय फिक्स्ड अॅसेट रजिष्टर (स्थावर मालमत्ता नोंदवही) सन २००८ ते २०१५ हे मिळकत विभागाने प्रमाणित करून देणे आवश्यक आहे. याशिवाय सन २०१० ते २०१६ प्रत्येक विभागनिहाय व आर्थिक वर्षनिहाय विविध करांच्या झालेल्या वसुलीचा तपशिल उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

याशिवाय नाशिकरोड विभागीय कार्यालयाचे सन २०१४-१५ पासुन बँक स्टेटमेंट व डे-बुक, तसेच सन २०१५-१६ पासुन सर्वसाधारण निधीचे बँक स्टेटमेंट व डे-बुक उपलब्ध करून द्यावे. सदरच्या बाबी उपलब्ध करून दिल्यास लेखे वेळीच पुर्ण करता येतील. याकडे मे. एम.ए.पी.एस.व्ही. अँड असोसिएट यांनी लक्ष वेधले आहे.

मे. एम.ए.पी.एस.व्ही. अँड असोसिएट यांनी १/४/२०११ ते ३१/३/२०१४ या कालावधीत प्राथमिक कामकाज पुर्ण केलेले आहे. सनदी लेखापालास आजपर्यंत एकूण र. रू. २४ लक्ष प्रदान झालेले आहे.

मे. एस.एस. मुथा अँड कंपनी यांना मनपा आदेश क्र. मनपा/लेखा/६२२/२००७ दि. १४/१०/२००७ अन्वये कामकाज यापूर्वी देण्यात आले होते. तथापि, सनदी लेखापालाने कामकाज न केल्याने बाह्य लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपाची पुर्तता न करता कामकाज प्रलंबीत ठेवल्याने तत्कालीन निविदेतील अट क्र. ६ अन्वये रिक्स अँड कॉस्ट पध्दीतने त्यांचे कामकाज दि. २८/१०/२०१६ अन्वये काढून घेण्यात आले आहे. तरी रिक्स अँड कॉस्ट पध्दीतीचा विचार करता यापुढे वसुली बाबत उचित कार्यवाहीची दक्षता विभागाने घेणे आवश्यक आहे.

नाशिक महानगरपालिकेत मे. एस.एस. मुथा आणि कंपनी यांनी तयार केलेल्या लेख्यांचे तत्कालीन परिस्थितीत बाह्यलेखापरिक्षक म्हणून मे. एस.सी. मोने अँड कंपनी यांनी दि. १/४/२००८ ते ३१/३/२०१० या कालावधीचा द्विनोंद लेखा पध्दीतीचा बाह्य लेखापरिक्षण करून तसा अहवाल लेखा विभागास प्राप्त झालेला आहे. त्या पध्दतीने सद्यस्थितीत पुर्तता झाली किंवा कसे याची खात्री करणे आवश्यक आहे.

वित्त व लेखा विभागाने मे. एम.ए.पी.एस.व्ही. अँड असोशिएट यांनी तयार केलेल्या लेख्यांबाबतही बाह्य लेखापरिक्षण करून यापूर्वी निदर्शनास आलेल्या त्रृटींची पुनरावृत्ती होत नसल्याची खात्री करण्यात यावी. तसेच वित्तीय वर्षनिहाय असे प्रमाणित लेखे वित्त व लेखा विभागाने प्रमाणित करून मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मा. स्थायी समितीवर मान्यतेस्तव सादर करावेत.

परिच्छेद क्र.६ :- नगरसेवक स्वेच्छा निधीबाबत.

नगरसेवक निधी या शिर्षाखाली वित्तीय वष्र २०१३-१४ मध्ये सुधारीत अंदाजपत्रकात २५४ लक्ष रूपयाची तरतुद केली होती. पत्यक्ष खर्च र.रू. १३.५९ लक्ष झाला आहे. वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये ५६५.५० लक्ष तरतुदीपैकी प्रत्यक्ष खर्च र.रू. ५.२३ लक्ष झाला आहे. सन २०१५-१६ मध्ये र. रू. ७७३.३० लक्ष तरतुदीपैकी र.रू. १.९३ लक्ष खर्च झाला आहे. वित्तीय वर्ष सन २०१६-१७ मध्ये र. रू. ७२२.९० लक्ष तरतुदीपैकी खर्च निरंक झाला असुन सन २०१७-१८ मध्ये र.रू. १०९४.०० तरतुदीपैकी खच्र निरंक झाला आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात र.रू. १५०४.० लख तरतुद करण्यात आली असुन प्रत्यक्ष खर्च निरंक झाला आहे. नगरविकास विभाग परिपत्रक क्रमांक AMC/१४२००/२२६४/प्र.क्र.१४४, नवि-२४ दिनांक २८/६/२००१ च्या मार्गदश्रक तत्वाप्रमाणे खर्च आवश्यक त्या बाबींवर निकडीप्रमाणे करणे गरजेचे आहे.

परिच्छेद क्र.७ :- अवसायक श्री. बालाजी को.ऑप. बँक व अवसायक श्री. श्रीराम को.ऑप, बँक यांचेकडील मुदत ठेवींबाबत.

नाशिक महानगरपालिकेने विविध निधीतील मुदतठेवी र. रू. ५३.६६ लक्ष श्री. बालाजी को.ऑप.बँकेत गुंतवणूक करण्यात आली होती. तसेच श्रीराम सहकारी बँकेत एकूण र. रू. ११.३४ कोटी मुदतठेवी म्हणून ठेवण्यात आलेल्या आहेत. यापैकी श्री. बालाजी बँकेकडील र. रू. ५३.६६ लक्ष वसुल झाले बाबत वित्त व लेखा अधिकारी यांचे पत्र क्र. लेखा/वशि/६८३/२०१९ दि. १/७/२०१९ अन्वये कळविले आहे. तथापि, श्रीराम सहकारी बँकेचे पैसे अद्यापही मनपास प्राप्त झालेले नाहीत. तरी विषयांकीत प्रकरणी व्याजासह पैसें मनपास प्राप्त होण्यासाठी मा. सहकार आयुक्त तथा निबंधक, सहाकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, वा नॅशनल कंझ्युमर फोरम यांचेकडे प्रकरण दाखल करून सदरचे पैसे व्याजासह परत मिळतील यासाठी प्रयत्नशिल राहणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.८ :- आगसुरक्षा निधीतील दि. ३१/०३/२०१९ अखेर शिल्लक रकमेच्या ताळमेळा बाबत.

महाराष्ट्र आगप्रतीबंधक आणि जिवसंरक्षक उपाय योजना अधिनियम २००६ च्या कलम २५(१) नुसार आग सुरक्षा निधी निर्माण करणे आवश्यक आहे. आग सुरक्षा निधीखाते स्टेट बँक ऑफ इंडिया मनपा शाखा येथे उघडले असुन, दि. ३१/३/२०१९ अखेर डे-बुकाची शिल्लक र. रू. ६६,६९,६२९/- असल्याबाबत पत्र क्र. लेखा/वशि/६३९/२०१९ दि. १/७/२०१९ अन्वये सादर केलेले आहे. सदर निधीचा वापर अग्निशमन सेवांच्या पायाभूत सुविधांसाठी करणे आवश्यक आहे. विषयांकीत निधीमधील रकमेची गुंतवणूक बँकेत मुदतठेवीमध्येही करण्यात आलेली आहे. डे-बुक ची

शिल्लक, बँक पासुबुक शिल्लक, एकूण मुदतठेव याबाबत वर्षअखेरीस ताळमेळ वित्त विभागाने घेऊन तसे प्रमाणित करणे आवश्यक आहे. तसेच अग्निशमन विभागाकडून मासिक जमा होणाऱ्या रकमांचा वित्त विभागाशी ताळमेळ घेणे गरजेचे आहे.

परिच्छेद क्र.९ :- सरकारी शिक्षण कर, रोजगार हमी कर, निवासी कर, शासकीय कोषागारात सन २०१८-१९ मध्ये भरणा केले बाबतचा तपशिल.

महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर (उपकर) अधिनियम १९६२ मधील तरतुदीनुसार शिक्षण कर व रोजगार हमी कर, निवासी कर मालमत्ता धारकांकडून वसुल केला जातो. वित्तीय वर्ष सन २०१८-१९ मध्ये र. रू. १२,३७,८०,९३१/- इतका शिक्षण कराचा भरणा कर, रोजगार हमी कराचा र. रू. २,०२,२७,६१८/- इतका भरणा केलेला आहे. वित्तीय वर्ष सन २०१६-१७ मध्ये र.रू. ५ कोटी शासनाकडे जादा जमा झाले बाबत मा. महालेखापाल यांनी निदर्शनास आणुन दिल्याचे संचिकेवरून दिसुन येते. सदरच्या अग्रीम जमा रकमांचे नंतरच्या वसुलीमध्ये समायोजन झाले किंवा कसे याबाबत विभागाने खात्री करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.१० :- स्थानिक संस्था कर परतावा रकमांच्या नोंदी व जमा रकमेच्या अभिलेख्यात घेणे बाबत.

विविध विभागांकडून करांच्या अनुषंगाने परतावा रक्कम मंजूर करण्यात येत असतात. सबंधीत परतावा मंजूर करण्याच्या प्राधिकाऱ्याने रक्कम दुबार प्रदान होत नाही याची खात्री करण्याची जबाबदारी परतावा मंजूर करणाऱ्या प्राधिकरणाची आहे. तथापि, लेखा शाखेमार्फत ती प्रदान होत असतांना सदरची रक्कम महानगरपालिकेच्या ज्या दिवसांच्या लेख्यांमध्ये रितसर जमा आहे त्यासमोर होणे आवश्यक आहे. तथापि, नियम ३२ व ४४ अंतग्रत स्थानिक संस्था कर परताव्या बाबतच्या नोंदी संबंधीत लेख्यांमध्ये घेतल्याचे दिसुन आले नाही. तरी विभागाने उचित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

परिच्छेद क्र.११ :- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात शिक्षण विभागाकडील प्रलंबीत निधी उपयोगिता प्रमाण पत्राबाबत.

वित्त व लेखा विभागाने सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात मनपा सर्वसाधारण निधी मधुन शिक्षण विभागास रकमा हस्तांतरीत केलेल्या आहेत. र. रू. ४५,८८,९२,५१३/- इकती रक्कम हस्तांरीत केल्याचे दिसुन येते. सदर रकमेच्या विनियोगाबाबत वित्त व लेखा विभागाने खात्री करणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शिक्षकांच्या डिसी.पी.एस. बाबत वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये र. रू. ३,३९,३१४/- इतकी रक्कम वग्र झालेली आहे. तथापि, शिक्षकांच्या डिसी.पी.एस. बाबत कोणतेही लेखे अद्यावत ठेवलेले नाहीत.

परिच्छेद क्र.१२ :- सन २०१८-१९ मधील विवाह नोंदणी शोधणावळ फी बाबत.

वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये विवाह नोंदणी अंतग्रत र.रू. ६,३०,७२६/- व प्रतिलिपी व ताडून तपासणी फी अंतग्रत र.रू. ९,४१,८७३/- इतकी रक्क्म जमा झाली आहे. तथापि, संबंधीत विभागांनी लेखा शाखेसोबत ताळमेळ घेतलेला नाही. महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन व विवाह नोंदणी नियम १९९९ नियम १२ नुसार सदरच्या रकमा शासन कोषागारात जमा झाल्या आहेत किंवा कसे याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच या रकमांचे मनपाच्या इतर लेख्यात वर्गीकरण झाले नसल्याबाबतही ताळमेळ घेऊन खात्री करणे आवश्यक आहे. यासाठी लेखा शाखेने संबंधीत विभागांना ताळमेळ घेणे बाबत सुचना देण्यात याव्यात.

परिच्छेद क्र.१३ :- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर निधीच्या विनियोगाबाबत व स्टँप रिसीट व उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणे बाबेत.

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण/११९८/प्र.क्र.३०/नवि-४/१ जुन २०१९ अन्वये अखर्चित निधीच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. अखर्चित निधी दि. ३० सप्टेंबर २०१९ अखेर खर्च न झाल्यास शासनास जमा करणे बाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. दि. १४/७/२०१९ अखेर खालील तपशिलाप्रमाणे निधी अखर्चित आहे. वित्त विभागाने संबंधीत विभागाचे लक्ष वेधून उचित कार्यवाही करावी.

अ.क्र.	योजनेचे नांव	शिल्लक रक्कम रूपये

१	नाविन्यपूर्ण योजना (निलगिरी बाग ॲटो मायसेशन)	१०.३३ लक्ष
२	दलित वस्ती	१३३४.५९ लक्ष
३	दलितेतर वस्ती सुधारणा योजना	२८१.४४ लक्ष
४	पर्यटन विकास योजना	७५ लक्ष
५	इतर नाविन्यपूर्ण योजना	१३७.९६ लक्ष
६	आमदार निधी	२६.८५ लक्ष
७	व्यायाम शाळा अनुदान	२.१२ लक्ष

महानगरपालिकेस मुलभूत सोईसुविधा, एल.बी.टी. अनुदान अल्पसंख्यांक योजना, नगरोत्थान योजना, अमृत योजना, नागरी दलित वस्ती सुधार योजना, रस्ता अनुदान, स्मार्ट सिटी केंद्र-राज्य हिस्सा अनुदान व प्रशासकीय कार्यालयीन अनुदान. अमृत योजना अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अनुदान वितरीत करण्यात आलेली आहेत. उपआयुक्त (प्रकल्प)/संबंधित कार्यकारी विभाग यांचेकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून वित्त विभागाच्या संग्रही ठेवणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.१४ :- निवृत्ती वेतन निधी.

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये र. रू. ८४०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली असुन, झालेला खच्र र. रू. ७३७५.९९ लक्ष इतका झालेला आहे. सहाय्यक आयुक्त (प्र.) व उपमुख्य लेखाअधिकारी यांनी याबाबत ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.१५ :- आस्थापना खर्चा बाबत.

वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये आस्थापना खर्च ३०.७३% असल्याचे लेखा विभागाचे पत्र क्र. मनपा/लेखा/४३६/२०१९ दि. ४/५/२०१९ अन्वये कळविणेत आलेले आहे. मनपाने आस्थापना खर्च नियंत्रणात राहाण्यासाठी स्वत:च्या उत्पन्नाची (महसुली जमांबाबत) अर्थसंकल्पात दर्शविलेल्या उदिष्टनिहाय रकमा जमा होण्या बाबत प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. याशिवाय थकबाकीच्या रकमांच्या वसुली बाबतही प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. तसेच आस्थापना विषयक खर्चामध्ये काटकसरीचे धोरणाचा यापुढेही खर्च नियंत्रित करणेसाठी अवलंब करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र.१६ :- प्रलंबित अग्रीमांबाबत.

महाराष्ट्र म्युनिसीपल अकौंट कोड १९७१ मधील नियम १८९ अन्वये नमुना १४७ मध्ये अग्रीम नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच अग्रीम विहीत वेळेत निर्धारीत हप्त्यात वसुल होत असल्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. महालेखापाल यांनी एकूण र. रू. २.८५ कोटी इतके विभागीय अग्रीमे प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आणले आहे. याच्या वसुली बाबत लेखा विभागाने प्रयत्नशिल राहणे आवश्यक आहे. याशिवाय सण अग्रीमाबाबत महाराष्ट्र म्युनिसीपल अकौंट कोड १९७१ मधील नियम १२६ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. सन २००६ पासुन नोंदवहीचे अवलोकन करता वसुली प्रलंबीत असल्याचे दिसुन येत आहे. याशिवाय वाहन अग्रीम व घरबांधणी अग्रीमा बाबतही उचित काग्रवाही करणे बाबत विभागाने कार्यवाही करावी. एकूण १०३३ कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीमे मंजूर केल्याचे दिसुन येत आहे. सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आवश्यक कागदपत्रे व हमीपत्रे याबाबत वित्त विभागाने खात्री करणे आवश्यक आहे. मासिक वेतन देयकातुन अग्रीमाची कपात होत असल्याबाबत (मुद्दल + व्याज) याची खात्री लेखा विभागाने करणे आवश्यक आहे.

ज्या कर्मचाऱ्यांकडे प्रशासकीय कारणांमुळे वसुली प्रलंबीत असेल किंवा विभागांकडून वेतन देयकात वसुली दश्रविलेली आली नसेल अशा प्रकरणांचा सर्वांगीण आढावा घेणे गरजेचे आहे.

परिच्छेद क्र.१७ :- नाशिक महानगरपालिका कर्जाच्या दायित्वा बाबत

नाशिक महानगरपालिकेने सिंहस्थ कुंभ मेळयाकरीता नाशिक मनपा हिस्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र कडून र.रू. ९५०० लक्ष इतके कर्ज दि. १६/५/२०१५ रोजी घेतले होते. मा. स्थायी समिती ठराव क्र. १०३ दि. २१/९/२०१८ व मा. आयुक्त यांचे आदेश क्र. मनपा/आस्वीस/३७४/२०१८ दि. २/१/२०१८ अन्वये कर्जाची परतफेड केलेली आहे. तसेच जेएनएनयुआरएम अंतग्रत घरकुल योजनेकरीता हुडकोकडून घेतलेले र. रू. ३५०० लक्ष कर्जही उक्त ठरावान्वये व आदशान्वये परत फेड केल्याने सद्यस्थितीत या दोन्हीही कर्जाचे दायित्वे निरंक आहेत.

परिच्छेद क्र.१८ :- वेतन देयके तपासणी बाबत.

विविध विभागांकडून प्राप्त होणारी वेतन देयके ही लेखा शाखेत प्राप्त झाल्यावर त्याची पडताळणी होणे व त्याअनुषंगाने अभिलेखे ठेवणे आवश्यक आहे. प्रशासन, मिळकत, तसेच संबंधीत विभाग प्रमुखांकडून प्राप्त होणारे अनुक्रमे सदनिका वाटप, प्रशासकीय शास्ती, वेतननिश्चिती, निवृत्ती वेतन वसुली, भ. नि. नि. अग्रीम मंजूरी तसेच घरबांधणे व इतर अग्रीम मंजूरी आदेश यांची संगणकीय वेतन प्रणालीमध्ये वेळीच नोंद होणे आवश्यक आहे. त्या अन्वये मनपा निवास स्थानांची अनुज्ञप्ती शुल्क वसुली, विविध अग्रीमे वसुली, वेतन निश्चितीची अंमलबजावणी व दिलेल्या शास्तीची खात्री लेखा विभागास करणे शक्य होईल.

परिच्छेद क्र.१९ :- बँक ऑफ महाराष्ट्रने मे. एमआयसी कंपनीस दिलेल्या बँक गॅरंटीच्या अनुषंगाने परस्पर वसुल केलेल्या कमिशन बाबत.

विद्युत विभागाचे पत्र क्र.मनपा/विद्युत/७५७/२०१३ दि. ३०/१०/२०१३ अन्वये र. रू. ८० कोटीची बँक गॅरंटी देण्यात आलेली आहे. बँक ऑफ महाराष्ट्र यांनी सदरच्या कमिशनपोटी वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये र.रू. ४५.८० लक्ष सन २०१६-१७ मध्ये र. रू. ४५.८० लक्ष व सन २०१७-१८ मध्ये र. रू. ४७.२० लक्ष इतके कमिशन वसुल केलेले आहे. याबाबत सक्षम प्राधिकरणास सदरची बाब अवगत करण्यात यावी, व याबाबत लेखा विभागाने बँकेस कमिशन वसुल करू नये असे दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने झालेली कार्यवाही अवगत करावी.

परिच्छेद क्र.२० :- मनपा कंत्राटदारांचे भविष्य निर्वाह निधी कपातीचे अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत.

मनपा कंत्राटदारांचे भविष्य निर्वाह निधी कपातीचे अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत मा. आयुक्त यांचे परिपत्रक क्र.लेखा/वशि/५१९/२०१९ दि. २३/५/२०१९ अन्वये कत्राटदारचे भविष्य निर्वाह निधी कपातीचे अभिलेखे व कपातीचा तपशिल वेळीच संबंधीत कार्यालयाला सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सन २०११ ते २०१६-१७ या कालावधीतील १०३ कंत्राटदारांपैकी २२ कंत्राटदारांकडील अभिलेखे व कपातीच्या तपशिलाबाबत माहिती मिळाली आहे. ८१ कंत्राटदारांची माहिती सादर होणे प्रलंबीत आहे. भविष्य निधी कार्यालयाकडून या प्रकरणी मनपावर दंडनीय कार्यवाही होऊ शकते. त्यासाठी उचित कार्यवाही सत्वर करणे गरजेचे आहे.

परिच्छेद क्र २१ :- जमा रक्कमा ताळमेळा बाबत :-

मनपाच्या अधिनस्त कार्यरत असलेले विविध विभागप्रमुख व विभागीय कार्यालय स्तरावर नागरीकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबत शुल्क आकारणीपोटी रक्कम जमा होत असतात. सर्व विभागांकडून अशा प्रकारच्या जमा रकमा ऑन लाईन प्रणाली किंवा पावती पुस्तकाद्वारे जमा करून मनपा खजिन्यामध्ये भरणा केल्या जातात. अशा भरणा केलेल्या रकमांच्या आधारे लेखा शाखेत लेखे तयार होत असतात. अशा जमा रकमांबाबत विभाग प्रमुखांनी मनपाच्या लेख्यांसोबत दरमहा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही विभाग प्रमुखांकडून होत नसल्याचे दिसुन येते. वित्त व लेखा विभागाने याबाबत सर्वच विभाग प्रमुखांना निर्देश देऊन त्यांच्याकडील लेखा शिर्षाच्या जमा रक्कमा ताळमेळ बाबत निर्देश देणे आवश्यक आहे. याशिवाय विभाग प्रमुखांनीही छपाई विभागाकडून वाटप झालेले पावती पुस्तके, त्याचा झालेला वापर व त्या अनुषंगाने जमा झालेल्या रक्कमा यांचा ताळमेळ पुर्ण करणे आवश्यक आहे, तथापि, असा ताळमेळ मनपामध्ये होत नसल्याचे दिसुन येते. सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्याकडील जमा लेखा शिर्ष अंतग्रत जमा होणाऱ्या रकमांचे द्विप्रतीत विवरणपत्र तयार करून लेखा शाखेकडे पडताळणीसाठी पाठविणे आवश्यक आहे. लेखा विभागाने जमा विवरण्पत्र पडताळून विभागास देणे आवश्यक आहे. लेखा विभागाने सत्र जमा विभागागांचे लक्ष वेधणे आवश्यक आहे. तसेच विभाग स्तरावरील कोषागार/खजिना विभागाचे लेखे मुख्यालयात अंतग्रत वेळीच होणे अपेक्षित असुन त्याबाबतही ताळमेळ होणे आवश्यक आहे. व दैनंदिन सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित करणे गरजेचे आहे.

परिच्छेद क्र २२ :- सुरक्षा अनामत लेख्यांच्या अनियमिततेबाबत.:- सन 2018-2019

संदर्भ :- १) जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क्-६/१२९/१९ दि. १८/०४/२०१९
२) जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क्-६/४४१/१९ दि. ०३/०५/२०१९

वार्षीक लेखे तपासणी कामी सुरक्षा अनामत अभिलेख्यांची पडताळणी केली असता खालील अनियमित बाबी आढळून आल्या. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम १९० मधील तरतुदीनुसार लेखे

ठेवलेले नाही. नियमानुसार तीन वर्षानंतर सुरक्षा अनामत पक्क्यासदरी जमा करून स्वतंत्र लेखे ठेवणे आवश्यक आहे. तथापी अशी कार्यवाही झालेली नाही.

१. सुरक्षा अनामत डिफेक्टलायबिलीटी कालावधी संपल्यानंतर तीन वर्षांनी खालील रक्कमा पक्क्या सदरी जमा केल्याचे दिसुन येत नाही. तसेच त्याचे स्वतंत्र लेखे अद्ययावत प्रमाणीत करणेत आलेले नाही, उदाहरणादाखल खालील तपशिल देण्यात आलेला आहे.

अ. क्र	मक्तेदाराचेनांव	पावती क्र. व दिनांक	रक्कम रुपये	कामाचा पुर्णत्वाचा दाखला	डिफेक्टीव्ह लायबिलीटी कालावधी	पक्क्या सदरीचा कालावधी दिनांक	पक्क्या सदरीतुन दिल्याचे व्हौऊचर क्र. व दिनांक
१	एशियन हौडोलिक्स	2479/65 6.12.14	25000/-	12/2/2014	१२ महीने	05/12/2017	9/24.4.2018
२	एशियन हौडोलिक्स	2629/25 20.10.15	9759/-	12/2/2014	12 महिने	05/12/2017	9/24.4.2018
३	पंढरी इन्फ्रा. प्रा.ली	1796/67 27/6/2011	20209/-	30/9/2014	36 महिने	29/09/2017	24/4.4.2018
४	पंढरी इन्फ्रा. प्रा.ली	2513/57 24/11/2014	74877/-	30/9/2014	36 महिने	29/09/2017	24/4.4.2018
५	रियाबल इले.	२७19/71 26/8/2016	36755/-	25/2/2017	12 महिने	*24/02/2018*	6/24.4.2018
६	रियाबल इले.	*2840/80 21/5/2017*	36753/-	25/2/2017	12 महिने	*24/02/2018*	6/24.4.2018
७	गैरव कन्स्ट्र.	2730/92 11/8/2016	26315/-	7/7/2016	12 महिने	06/07/2017	7/24.4/2018
८	गैरव कन्स्ट्र.	2765/81 11/8/2016	12275/-	7/7/2016	12 महिने	06/07/2017	7/24.4/2018
९	गैरव कन्स्ट्र.	2728/92 8/8/2016	25580/-	20/6/2016	12 महिने	19/6/2017	7/24.4/2018
१०	गैरव कन्स्ट्र.	2745/21 11/8/2016	14445/-	12/9/2016	12 महिने	11/09/2017	7/24.4/2018
११	गैरव कन्स्ट्र.	2727/71 4/8/2016	4180/--	20/1/2016	12 महिने	19/01/2017	7/24.4/2018
१२	गैरव कन्स्ट्र.	2584/08 *7/4/2015*	5000/-	7/10/2015	12 महिने	06/10/2016	7/24.4/2018
१३	गैरव कन्स्ट्र.	2662/57 16/2/2016	4883/-	7/10/2015	12 महिने	06/10/2016	7/24.4/2018
१४	गैरव कन्स्ट्र.	2584/06 *7/4/2015*	5000/-	6/10/2015	12 महिने	05/10/2016	7/24.4/2018
१५	गैरव कन्स्ट्र.	2727/05 3/8/2016	4921/-	6/10/2015	12 महिने	05/10/2016	7/24.4/2018
१६	गैरव कन्स्ट्र.	2584/14 7/4/2015	5000/-	6/10/2015	12 महिने	05/10/2016	7/24.4/2018
१७	गैरव कन्स्ट्र.	2727/08 3/8/8/2016	4652/-	6/10/2015	12 महिने	05/10/2016	7/24.4/2018
१८	गैरव कन्स्ट्र.	2584/9 7/4/2015	5000/-	6/10/2015	12 महिने	05/10/2016	7/24.4/2018
१९	गैरव कन्स्ट्र.	2727/04 3/8/2016	4918/-	6/10/2015	12 महिने	05/10/2016	7/24.4/2018
२०	गैरव कन्स्ट्र.	2584/11 7/4/2015	5000/-	19/9/2015	12 महिने	18/06/2016	7/24.4/2018
२१	गैरव कन्स्ट्र.	2724/62 26/7/2016	2447/-	26/7/2016	12 महिने	25/07/2017	7/24.4/2018
२२	गैरव कन्स्ट्र.	2784/07 7/4/2015	5000/-	18/9/2015	12 महिने	17/09/2016	7/24.4/2018
२३	गैरव कन्स्ट्र.	2724/63 26/7/2016	2198/-	18/9/2015	12 महिने	17/09/2016	7/24.4/2018
२४	गैरव कन्स्ट्र.	2584/13 7/4/2015	5000/-	28/5/2015	12 महिने	27/5/2016	7/24.4/2018
२५	गैरव कन्स्ट्र.	2657/94 2/11/2015	4747/-	28/5/2015	12 महिने	27/6/2016	7/24.4/2018
२६	गैरव कन्स्ट्र.	2441/69 23/5/2014	21871/-	6/3/2014	12 महिने	5/3/2015	7/24.4/2018
२७	गैरव कन्स्ट्र.	2407/31 1/7/2014	22708/-	5/3/2014	12 महिने	4/3/2015	7/24.4/2018

- विविध कामाच्या संदर्भात सुरक्षा अनामत जमा होत असते सदर सुरक्षा अनामत मुदतबाह्य रक्कमा पक्क्या सदरी जमा करणे आवश्यक हेाते परंतु अशा प्रकारचे लेखे लेखाविभागाने ठेवलेले दिसून येत नाही.
- उपरोक्त नमुद रक्कमा पक्क्या सदरीनंतर दिल्याचे दिसून येते. परंतु सदर रक्कमा देतांना सक्षम प्राधीकरणाची मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

2) सुरक्षा अनामत रक्कमांच्या परतफेडीच्या नोंदी न घेतल्याचा उदा. तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	मकातेदाराचे नाव	पावती क्र. दिनांक	व्हौचर क्र. व दिनांक	र.रु	पान क्र.
१	श्री.शेख एन शमशोनद्दीन	2890/81	16/02/2018	3930	1050

२	निहाय जे शेख	2890/82	16/02/2018	4066	1050

- सुरक्षा अनामत परतफेड केल्या मात्र त्याच्या नोंदी सदर खतावणी रजिष्ट्ररवर घेण्यात आलेल्या नाही . उदा. दाखल वरील प्रकरणे दर्शविले आहे. परंतु अशा सर्वच प्रकारच्या परतफेडीच्या नोंद घेण्यात आलेले नाही.
- परतफेडीच्या नोंदी न घेतल्यामुळे सदर रक्कमा दुबार देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. विविध कामोचे निविदेच्या वेळी मकातेदाराकडून ऑनलाईन बयाना व सुरक्षा अनामत रक्कमा घेतल्या जातात व त्याच्या परतफेडीही केल्या जातात याबाबतच्या एकुण किती रक्कमा जमा आहे व किती रक्कमा परतफेड केल्या याबाबत लेखा विभागाने कोणतेही प्रकारचे लेखे अद्ययावत ठेवलेले नाही.

४. सुरक्षा अनामत एकुण जमा किती आहे,परतफेड किती व शिल्ल्क किती आहे याबाबतचा गोषवारा तयार केलेला नाही.

५. पक्क्या सदरी रक्कमांच्या नोंदी स्वतंत्र घेणेत आलेले नाही. तसेच त्याची परतफेड करतांना सक्षम प्राधीकरणाची मान्यताही घेण्यात आलेली दिसून येत नाही. विभागाने अनुपाल सादर केले नसल्याने उपरोक्त बाबींचा पुर्ततेसह अनुपालन सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे

परिच्छेद क्र २३ :- <u>परिभाषित अंशदान निवृत्तीवेतनाबाबत अनियमितता :-</u>

संदर्भ :- १) जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क्-६/१२९/१९ दि. १८/०४/२०१९
२) जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क्-६/४४१/१९ दि. ०३/०५/२०१९

मनपा ठराव क्र. १२५६ दिनांक २०/०२/२००८ व आदेश क्र. ७८५ दिनांक २५/०६/२००८ अन्वये दिनांक ०१/११/२००५ पासून मनपाने परिभाषित अंशदान योजना लागु केली आहे.

दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व तद्नंतर महानरपालिकेच्या सेवेत नियुक्त झालेले किंवा तद्नंतर होतील त्यांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अंनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबंर २००५ व शासन निर्णय क्रमांक अंनियो/ १००६/८७/सेवा-४ दिनांक १२/०१/२००७ नुसार त्यांच्या एकत्रित वेतनाच्या १०% इतकी रक्कम परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन कपात करणे आवश्यक आहे व तितकीच रक्कम शासनाच्या धोरणानुसार नाशिक महानगरपालिका दरमहा त्यांच्या खात्यात जमा करून दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर व्याजासह जमा होणा-या रकमेचे विवरणपत्र प्रत्येक अंशदान निवृत्तीवेतन धारकास देणे आवश्यक आहे.

या संदर्भातील लेख्यांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळूनआल्याने तदनुषंगिाक अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

१) नाशिक महानगरपालिकेत सन २०१८-१९ आर्थिक वर्षात DCPS वर्गणीदारंची एकुण संख्या ११८० इतकी असल्याची लेखा व वित्त विभागाचे प्र जा.क्र/मनपा/लेखा/६७१/२०१९ दिनांक २८/६/२०१९ अन्वये लेखा विभागाकडून माहिती दिली आहे. मात्र संवर्ग निहाय (DCPS) योजना लाभांतर्गत वर्गणीदारांची एकुण संख्या व यादी उपलब्ध करून देण्यात आली नाही.

२) ब्रॉडशिट, लेजर, बृहतपत्रक, डेबुक बँकरिकन्सीलेशन इत्यादी लेखे वारंवार तोंडी व लेखी मागणी करूनही पडताळणीसाठी उपलब्ध झालेले नाहीत.

३) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो/१००७/१८/सेवा-४ दिनांक ७ जुलै २००७ मध्ये नमूद केले प्रमाणे लेखे ठेवलेले नाही.

४) (DCPS) लागु असलेल्या कर्मचा-यांच्या वेतनातून झालेल्या कपाती व तितकाच मनपा हिस्सा व त्यावरील व्याज एकुण रक्कम अशा बाबतच्या कोणत्या ही नोंदी विभागाने ठेवलेल्या नाही.

५) सुरवातीची शिल्लक (DCPS) कर्मचारी त्यांचे दरमहाचे १०% वेतनाची वर्गणी तितकाच मनपा हिस्सा असे दरमहा तसेच वर्षाचा एकुण कर्मचा-यांचा व मनपा सममुल्य अंशदान असे एकुण रक्कमेचा गोषवारा ठवेलेला नाही.

६) वित्तीय वर्षामध्ये प्राप्त झालेल्या निधीची गुतंवणूक केल्याबाबतचा अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

७) कर्मचा-यांना द्यावयाचे वार्षिक विविरणपत्र अद्याप पावेतो कर्मचा-यांना देण्यात आलेले नाही.

८) सन २०१६-२०१७ व २०१७-१८ च्या वार्षोक अहवालत याबाबत सुचित करण्यात आले होते. परंतु विभागाने याबाबत विभागाने पुतर्ता केलेली नाही. तरी सदरची कार्यवाही सत्वर होणे आवश्यक आहे. मनपाच्या ईआरपी प्रणालीमधुनच सदरची वार्षिक विवरणपत्रे तयार होणे आवश्यक आहे. एखादा कर्मचारी मयत झाल्यास/सेवा सोडुन गेल्यास त्यास द्यावयाचे लाभ यासाठी वार्षिक विवरणे वेळीच जाणे गरजेचे आहे.

९) मनपाने या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे राज्याने स्विकृत केलेल्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत समावेश केल्यास कर्मचाऱ्यांना फायदे व परतावेही उत्तम मिळतील, तसेच लेखेही कर्मचाऱ्यांना वेळीच मिळतील.

परिच्छेद क्र २४ :- कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी बाबत.

संदर्भ :- १) जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क-६/१२९/१९ दि. १८/०४/२०१९
२) जा.क्र./मुलेप/वशि/डेस्क-६/४४१/१९ दि. ०३/०५/२०१९

उपरोक्त विषयांन्वये सन 2018-2019 या वित्तीय वर्षात कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यांतील अनियमितते बाबत.

1) जा.क्र.मुलेप/वशि/डेस्क-4/04//18 दिनांक 04/04/2018 व जा.क्र. मुलेप / वशि /डेस्क् -13/117/18 / दि. 19/04 /2018 रोजी भविष्य निर्वाह निधीचे अभिलेख्यांची मागणी केली असता विभागाने प्रमाणीत ब्रॉडशिट व लेजर, डे-बुक इ. लेखे पडताळणीसाठी उपलब्ध झाले नाहीत यामुळे नाशिक महानगरपालिकेत सन 2018-2019 आर्थिक वर्षात मनपा भविष्य निर्वाह निधी किती वर्गणीदार आहे. परतावा/नापरतावा अग्रीमाची मागणी अर्ज भविष्य निर्वाह निधीचे वार्षीक वित्तीय वर्ष 2018-19 चे झालेले वाटप याची खात्री करता आलेली नाही.

2) ना परतावा अग्रीम काढण्याबाबत सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1988 मधील नियम क्र.16 ते 20 मधील तरतुदीनुसार वर्गणीदाराच्या सहा महिन्याच्या वेतना एवढी रक्कम किंवा निधीतील शिल्लक रक्कमेच्या 50% यापैकी जी कमी असेल ती रक्कम किंवा वर्गणीदाराच्या खात्यात शिल्लक रकमेच्या जास्तीत जास्त 75 % एवढी रक्कम मंजूर करू शकतो तथापि, याबाबींची खात्री न करता उदाहरणादाखल म्हणून खालील बाब दिसुन येते.

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव	कर्मचारी क्र.	व्हौचर क्रमांक	जमा वर्गणी	75% प्रमाणे देय रक्कम	दिलेली रक्कम
1	श्रीमती. सुरेखा विकास घोलप	4405	35	1293143/-	969857/-	10,34,000/-

3) सन 2018-2019 या आर्थिक वर्षाचे भवष्यिनिर्वाह निधीचे लेखापरिक्षणात मयत/स्वेच्छानिवृत्त व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी अधिकारी यांना त्याच्या खत्यतील जमा असलेली वर्गणी देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी पडताळणी केली असता त्यातील खालील कर्मचारी यांना वर्षातून तिन वेळेस कर्जाऊ रक्कमा दिले असल्याचे निर्दशनास येते. उदा.दाखल खालील प्रमाणे

अ.क्र.	कर्मचारी/अधिकारी नांव	कर्मचारी क्रमांक	हुद्दा
1	श्री. देवल आर बर्वे	6091	स. कामगार
2	श्री. डी.डी. गायकवाड	6378	स. कामगार

4) भविष्य निर्वाह निधीतुन शैक्षणीक कामाकरीता, मुलाचे किंवा मुलीचे लग्नाकरीता, घरबांधणी व दुरूस्ती करीता याकामासाठी परतावा रक्कम अग्रीम म्हणून घेतली जाते. तथापी सदर प्रकरणा सोबत पुरावादाखल अनुषंगिक कागदपत्र जोडलेले नाही. खालील उदा.

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव	कर्मचारी क्र.	व्हौचर क्रमांक	घेलेतली रक्कम	ज्याकारणासाठी घेतली ते कारण
1	श्री. गणेश बाबुराव निकुंभ्	6492	03	30,000/-	शैक्षणीक कामास
2	श्री. रामदास तुळशीराम निरभवणे	8042	15	50,000/-	घर बांधणी /दुरूस्ती
3	श्री. दिपक अशोक त्रंबके	9066	09	1,00,000/-	घरकामासाठी
4	श्री. अरूण नामदेव निकम	7877	17	1,00,000/-	घर बांधणी /दुरूस्ती
5	श्री. शेळकेएस.डी.	7119	37	3,00,000/-	घर बांधणी /दुरूस्ती
6	श्रीमती. सुरेखा विकास घोलप	4405	35	10,34,000/-	शैक्षणीक कामास

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कर्मचा-यानी भविष्य निर्वाहनिधी खात्यातुन शैक्षणीक, लग्नाकरीता, घरबांधणी/दुरूस्ती करीता इ. कारणांकरीता रक्कम घेतल्या आहे. परंतु रक्कम देतांना प्रकरणासोबत सबळ पुरावे जोडलेला आढळून येत नाही उदा. शैक्षणीक कामाकरीता भविष्य निर्वाह निधी नियम 1988 मधील 13 (ब) मध्ये उच्चशिक्षण तांत्रिक,व्यावसायीक शिक्षण,

पाठ्यक्रम,वैद्यकीय, अभियांत्रिकी इ. शिक्षण कामाच्या खर्च भागविण्यासाठी देणे बाबत उल्लेख आहे. प्रमाणे विभागाने शहानिशा वा त्याबाबतचा पुरावा जोडलेला दिसून येत नाही.

घरबांधणी कामी वास्तुविशारद यांचे तपासणी अहवाल व इस्टिमेट सोबत जोडलेले नाही. घर बांधणी किंवा दुरूस्ती नंतर त्याबाबतचे वास्तुविशारद यांचे प्रमाण पत्र जोडलेले नाही, तरी यापुढे अशी खात्री करण्याची दक्षता घ्यावी.

5) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी नियम 1988 माधील 5 नुसार प्रत्येक भविष्य निर्वाहनिधी वर्गणीदाराने पहिल्या अनुसुचित देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये नामनिर्देशन करणे आवश्यक आहे. तरी नामनिर्देशन अद्यावत असल्याची खात्री करावी.
6) एकत्रित गोषवारा नोंदवीत नसल्याने चालु वर्षाची एकुण जमा, उचल व देय व्याज तसेच खतावणी, बृहतपत्रक, रोखवही अद्यावत नसल्याने वसुली अग्रीमाचे बाबत खात्री झालेली नाही.
7) भविष्य निर्वाह निधीची कमाल रक्कम कर्मचा-यांच्या मासिक वेतनाच्या मुळ वेतन व ग्रेड पे पेक्षा जास्त नसावी. परंतु खालील तक्त्यात नमुद कर्मचा-यांचे मुळ वेतन व ग्रेड पे यांच्या पेक्षा जास्त वर्गणीची कपात करण्यात आल्याचे दिसून येते.

एप्रिल पेड इन ऑक्टोंबर 2018 बेसिक व ग्रेड पे पेक्षा भ.नि.नि. ची वर्गणी जादा कपात झाल्याचा तक्ता खालील प्रमाणे

अ. क्र.	क.क.	कर्मचा-यांचे नांव	हुद्दा	बेसिक	ग्रेड पे	एकुण वित्तलब्धी	भ.नि.नि. ची वर्गणी	दरमहा जादा कपात र. रू
1	6242	Tathe Sanjay Namdev	SWEEPER	10740.00	1900.00	12640.00	14000.00	1360.00
2	3336	Kohok Bhaskar Shivaji	SENIOR CLERK	19280.00	4300.00	23580.00	25000.00	1420.00
4	1474	Shinde Janardan Gajanan	CLERK	12090.00	2400.00	14490.00	16000.00	1510.00
8	3894	Jadhav Manoj Sharad	SENIOR CLERK	18580.00	4300.00	22800.00	25000.00	2120.00
9	4968	Mahale Ashok Vishnu	CLERK	14600.00	4200.00	18800.00	21000.00	2200.00
13	1158	Pawar Raman Baburao	PEON	15400.00	2400.00	17800.00	30000.00	12200.00
15	5672	Shinde Sanjay Haribhau	HELPER	10350.00	1800.00	12150.00	13000.00	850.00
19	1859	Gadgil Dilip Vitthal	BIGARI	11120.00	1800.00	12920.00	14000.00	1080.00
21	5764	Charoskar Chandrakant Motiram	SWEEPER	10350.00	1800.00	12150.00	13500.00	1350.00
22	6171	Gavare Vijay Jabaji	SWEEPER	9380.00	1800.00	11180.00	14000.00	2820.00
23	2883	Pagare Sunil Ranganath	SWEEPER	13070.00	1900.00	14970.00	15000.00	30.00
24	6256	Shelke Vikas Eknath	SWEEPER	10740.00	1900.00	12640.00	13500.00	860.00
25	3153	Donde Arun Rupchand	SWEEPER	13070	1900.00	14970.00	15000.00	30.00
30	8183	Mandlik Dilip Yashvant	SWEEPER	9550.00	1900.00	11450.00	15000.00	3550.00
31	4881	Khairnar Nivrutti Namdev	PAINTER	17360.00	3150.00	20510.00	21000.00	490.00
32	3646	Shane Ashok Baban	ROAD SUPERVISIOR	13260.00	1900.00	15160.00	18000.00	2840.00
33	6345	Kharde Santosh Ramdas	SWEEPER	10350.00	1800.00	12150.00	13000.00	850.00
35	1878	Gangurde Suresh Kacharu	WATCHMAN	11540.00	1900.00	13440.00	15000.00	1560.00

वरील प्रमाणे सन 2017-2018 या वित्तीय वर्षात कर्मचा-यांच्या मासिक वर्गणी त्यांच्या मुळ वेतन व ग्रेड-पे मिळून होणा-या रक्कमेपेक्षा जादा मासिक वर्गणी कपात करण्यात आली आहे. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम 1988 मधील ८ (ब) नुसार कोणतीही रक्कम वित्तलब्धीच्या 6 टक्के रकमेपेक्षा कमी नसेल आणी त्याच्या वित्तलब्धतेपेक्षा जास्त नसेल, याची खात्री विभागांनी व संगणक प्रणालीमध्ये सुधारणा करून करणे शक्य आहे, तेशी काग्रवाही व्हावी.

मुळवेतन + ग्रेड वेतनाच्या कमीतकमी 6 टक्के व जास्तीत जास्त मुळवेतन + ग्रेड वेतना इतकीच भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी असणे आवश्यक आहे. मात्र वरील उदा. दाखल प्रकरणांत सदर कर्मचा-यांची भविष्यनिर्वाह निधीची वर्गणी मुळवेतन + ग्रेड वेतना पेक्षा जादा कपात केली आहे.

अशा प्रकारे वित्तलब्धी पेक्षा जादा कपात करण्यात आलेल्या वर्गणीवर वर्षात जमा झालेल्या एकूण वर्गणीवर सदर कर्मचाऱ्यांस जादा व्याज अदा झालेले आहे, याची खात्री करावी व उचित कार्यवाही करावी.

8) सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त, मयत कर्मचाऱ्यांना भ.नि. निधी अंतिम प्रदान करतांना वसुली झाल्याचे एकूण 49 प्रकरणे निदश्रनास आली आहेत. याबाबतची वसुली करणे बाबत मनपा लेखा/3/2019 दि. 20/4/2019 अन्वये निवृत्ती वेतन शाखेस पत्र दिलेले आहे. तथापि, काही प्रकरणे मोठ्या प्रमाणावर अतिप्रदान असल्याने त्यांच्या वसुलीबाबत अवगत करण्यात यावे.

अ.क्र.	कर्मचारी क्रमांक	नांव	र. रूपये
1	6337	एस.आर. गाडेकर	28,363/-
2	5516	एन. एम. शिंदे	22,700/-
3	5511	एच. बी. उन्हवणे	21,843/-
4	4841	डी. एन. हांडोरे	2,73,838/-
5	4017	जी. बी. कुलकर्णी	6,138/-
6	3638	राज चारंजेय लाल	7,117/-
7	3620	व्ही. आर. इंगोले	1,133/-
8	4443	श्रीमती मनी मकवाना	2,000/-
9	4255	पी. डी. पाटील	2,109/-
10	3960	के. टी. तांबट	3,376/-
11	3730	आय. ए. शेख	1,191/-
12	2459	श्रीमती सुकुमा रतन	10,565/-
13	2414	लक्ष्मी परमार	22,027/-
14	1928	एन.ए. शेख	62,087/-
15	1924	पी. जी. काळे	13,477/-

निवृत्तीवेतनाचे देयके पारीत करीत असतांना वित्त विभागाकडून सदरची खात्री होणे आवश्यक आहे. याशिवाय सेवानिवृत्त उपशिक्षक कर्मचारी क्रमांक 4646 श्री. कैलास निवृत्ती अहिरे यांना 11,12,312/- व श्री.राजेंद्र मोतीराम पवार उपशिक्षक कर्मचारी क्रमांक 4786 र. रू. 4,67,557/- यांना अतिप्रदान झालेले आहे. विषयांकीत प्रकरणी लेखा विभागाकडून पैसे खजिन्यात भरण्याबाबत कळविणेत आलेले असुन अद्यापही भविष्य निर्वाह निधी अतिप्रदान रक्कम वसुली बाबत कार्यवाही झालेली नाही. विषयांकीत प्रकरणी सत्वर कार्यवाही होणे आवश्यक आहे. रक्कम वसुली बाबत विविध प्रशासकीय मार्गांचा वापर करणे गरजेचे आहे. मुळ निवृत्ती वेतनाच्या 1/3 रक्कम व संपूर्ण महागाई भत्ता तसेच वेळोवेळीचे फरक समायोजित करणे बाबत विभागाने प्रयत्न करावेत. तसेच एकरकमी रक्कम भरणे बाबतही कार्यवाही करावी.

परिच्छेद क्र २५ :- अदा केलेल्या रक्कमांचे प्रमाणके प्रमाणीत करणे बाबत.

सन 2018-19 या आर्थिक वर्षात लेखा विभागाने अदा केलेल्या रक्कमांचे प्रमाणके प्रमाणीत करणे आवश्यक आहे. ज्याअन्वये संबंधित व्यक्तींना/ मक्तेदारांना अदा केल्या रक्कमा व वजावटी केल्या याबाबतची खात्री करता येते. यापुढे विभागाने, उपमुलेप यांनी दक्षता घ्यावी.

परिच्छेद क्र २६ :- संगणक अग्रीमची वसुली न झालेबाबत.:-

महानगरपालिकेकडून अधिकारी/कर्मचारी यांना वाटप केलेल्या संगणक अग्रीम वसुलीची तपासणी केली असता परत फेडीची मुदत संपुन देखील खालील कर्मचाऱ्यांचेकडे संगणक अग्रीमची रक्कम येणे बाकी असल्याचे दिसुन आले.

वसुली 40 समान निर्धारित हप्त्यांमध्ये

अ क्र.	कर्मचारी क्र.	आर्थिक वर्ष	रजिष्टर पुष्ठ क्र.	कर्मचारी नाव	अग्रीम मंजूर दिनांक	वसुली पूर्ण होण्याची निर्धारीत दिनांक	वसुल/ समायोजन बाकी	शेरा
1	6310	2013-14	1	श्री. डी.टी. गुळवे	29/5/13	30/9/16	9000	मयत
